म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 303
REFBK-0001522

म. ग्रं. सं. ठाणें
निबंध
303
REFBK-0001522

# [illegible]थ्याचा मोह

(एक निबंध)

जितेंद्रियस्य दान्तस्य जितश्वासात्मनो मुनेः ।
मद्धारणां धारयतः का सा सिद्धिः सुदुर्लभा १
अन्तरायान् वदन्त्येता युंजतो योगमुत्तमम् ।
मया संपद्यमानस्य कालक्षपणहेतवः ॥ २ ॥
—भागवत, एकादशस्कंध.

लेखक—बाळकृष्ण भाऊ जोशी.

१५२२

आक्टोबर १९१८.

किंमत १॥ आणा.

नं. ३०२

- लेखक -

# सामर्थ्याचा मोह.

सांडूनि अक्षय सुख। सामर्थ्य इच्छिती ते मूर्ख।
कामनेसारिखें दुःख। आणीक कांहींच नाहीं॥
बहुत ज्ञातीं नागवलीं। कामनेनें वेडीं केलीं।
कामना इच्छितांचि मेलीं। बापुडीं मूर्खें॥३७॥

— दासबोध, द. ५ स. २

या सर्व दृश्य जगांत स्थूल किंवा सूक्ष्म, प्रत्यक्ष किंवा भावनात्मक असे जे जे पदार्थ आहेत, ते सर्वहि जरी आपण संपादन केले, तरी त्यांयोगें आपणाला अक्षय्य समाधान प्राप्त व्हावयाचें नाहीं; म्हणून या सर्वांवरील आसक्ति दूर झुगारून देऊन अंतर्मुख व्हावें, व एका परमेश्वराचा मात्र शोध घ्यावा आणि त्याच्या प्राप्तीच्या योगें अक्षय्य समाधानास पावावें, असा जेव्हां मनुष्याचा ठाम निश्चय होतो, तेव्हां तो परमार्थाकडे वळला म्हणावयाचा. थोर संपत्ति, प्रचंड विद्वत्ता, विस्तृत कीर्ति, अथवा शरीरसौंदर्य किंवा बळ इत्यादि कितीहि पदार्थ प्राप्त करून घेतले तरी ते एक-अनेक-क्षणांपलीकडे अधिक सुखी कर-

ण्यास समर्थ नाहींत; म्हणून अक्षय्य शांतीसाठीं एका परमेश्वरालाच शरण जाणें आतां अवश्य आहे, असा भाव ज्या दिवशीं मनुष्याच्या मनांत उत्पन्न होतो, त्याच दिवशीं त्याचें पाऊल परमार्थ-मार्गांत पडलें म्हणावयाचें. ह्या सर्व बाह्य पदार्थांत किंचित्काल मात्र सुख देण्याचें सामर्थ्य आहे; शिवाय ते सर्व कालानें विनाश पावणारे आहेत, चिरंतन राहूं शकत नाहींत, म्हणून त्यांच्या भरीस न पडतां अक्षय्य सुखासाठीं परमेश्वराची प्राप्ति करून घ्यावी, असें मनापासून वाटूं लागणें हाच परमार्थांतला खरा प्रवेश होय. अशा प्रकारें दृश्य वस्तूंची आसक्ति जोंवर सुटली नसेल, तोंवर केली जाणारी भक्ति, जपध्यानादिक, हीं सर्व 'परमार्थ' या संज्ञेस पात्र नसून तो एक संसार-सुखाचाच भाग होय. आपल्या शरीराला, तसेंच आपल्या कुटुंबांतील मंडळीला सुख लागावें, अशी कांहीं तरी बुद्धि पोटांत धरून जीं कुलपरंपरेनें चालत आलेलीं कर्मे व ईश्वरपूजनें लोकांत केलीं जातात, तीं बाह्यतः परमार्थाच्या स्वरूपाचीं दिसत असलीं तरी,

अशाच एका विशिष्ट उद्देशाला धरून तीं केल्यामुळें त्यांना वास्तविकपणें परमार्थाची संज्ञा देतां येत नाहीं. तेव्हां हा सर्व पदार्थपरिवार आपणाला चिरकालिक सुख देण्यास असमर्थ असल्यामुळें मला याची आवश्यकता नाहीं; तो असा असो वा तसा असो-मला फक्त एक परमेश्वर प्राप्त करून घ्यावयाचा आहे; असा पूर्ण दृढ निश्चय होतो, तेव्हांच खरा परमार्थाचा मार्ग चालण्यास मनुष्याची सुरवात होते.

याप्रमाणें परमार्थमार्गांत प्रवेश केल्यानंतर चिरंतन समाधानाच्या प्राप्तीसाठीं मनुष्य साधनें शोधूं लागतो. कोणाचें ऐकून व पाहून आणि त्यांत साधारणपणें आपलीहि बुद्धि चालवून, आपण शमदमादि प्रकारास आरंभ करावा, हें त्यास साहजिकच कळून येतें. निदान आपल्या भारतवर्षांत तरी अशीं साधनें माहीत होण्यास कांहीं फारसे आयास घ्यावे लागत नाहींत, असें म्हणण्यास चिंता नाहीं. आपल्या देशाचा हा एक विशेषच आहे कीं, येथें जन्मास आलेल्या लोकांचा

कल परमार्थाकडे स्वभावतःच अधिक असल्याचें आढळून येतें. म्हणून धर्म व तत्त्वज्ञान यांसंबंधींच्या उच्च मनोवृत्तींचें पीक इतर सर्व देशांपेक्षां या देशांत स्वभावतःच जास्त येतें. अथवा अन्य देशांतून जेव्हां कोणी मनुष्य या उच्च अवस्थांपर्यंत पोंचण्याला पात्र होतो, तेव्हां तो भारतवर्षांत जन्म घेऊन येतो असें म्हटल्यासहि चालण्यासारखें आहे. असो, तर याप्रमाणें परमार्थमार्गांत प्रवेश करून मनुष्य कांहीं साधन आचरूं लागला म्हणजे तो या परमार्थपंथावर चालूं लागला असें होतें. शम आणि दम, म्हणजे मनाचें व इंद्रियांचें आकलन करण्याचा अभ्यास, तो करण्यासाठीं मनुष्य सारखा जपूं लागला, म्हणजे तो परमार्थमार्गी झाला, असें म्हणावयाचें.

अशा प्रकारें साधकाच्या अवस्थेस पोंचून मनुष्य पुढील प्रदेशाकडे जेव्हां आपली दृष्टि पोंचवूं लागतो, तेव्हां तेथें त्याला अनेक

## चित्रविचित्र देखावे

दिसूं लागतात. आपणाला आत्मोन्नति साधावयाची आहे, असें त्यानें निश्चित केलें असल्या-

मुळें, ज्यांनीं ही आत्मोन्नति साधली आहे, अशां-च्याकडे त्याचे डोळे साहजिकच ओढ घेऊं ला-गतात. कारण जे लोक या मार्गानें पुढें गेलेले असतात, व ज्यांनीं परमेश्वराची कृपा संपादन करून आपणांला पूर्णपदावर आरूढ करून ठे-विलेलें असतें, त्यांच्याचपासून याला सर्व शिक्षण संपादावयाचें असतें व त्यांचेच मार्ग व अनुभव ध्यानांत आणून त्याला आपलें तारूं पुढें न्याव याचें असतें. अशा वेळीं स्वशक्त्यनुसार मार्ग-क्रमण क ीत व पुढें गेलेल्या लोकांकडे सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करीत साधक जेव्हां आपला पल्ला गांठण्याचा प्रयत्न करीत असतो, तेव्हां या परमार्थाच्या रस्त्यावरहि, चक्चक् करणारे कांहीं पदार्थ संसारप्रदेशाप्रमाणेंच याचे दृष्टीस पडतात. ते पाहिल्याबरोबर, आपण या मार्गाला लागलों आहों ते चिरंतन समाधान शोधून प्राप्त करून घेण्यासाठीं फक्त याचसाठीं लागलेले आहों, हें जरी त्याला पूर्ण स्मरण असलें, तरीहि येथें त्या चकचकित पदार्थांचें वैभव त्याला मोहित करून लालचावून मार्गावरून च्युत करण्याचा प्रयत्न

केल्यावांचून राहत नाहीं. अशा वेळीं त्या आप आपुढें गेलेल्या पुरुषांच्या अंगच्या बाह्यवैभवाचा प्रकाश पाहून हा साधक "चिरंतन सुख" या आपल्या ध्येयापासून ढळून 'आपणहि असेच थोर, समर्थ व वैभवशाली व्हावें;' अशा प्रकारची एक दुर्वासना त्याच्या पोटांत शिरून तेथें बिऱ्हाड करण्याचा प्रयत्न करूं लागते. मानसिक, बौद्धिक इत्यादि कांहीं तरी विशेष सामर्थ्य आपणाला यावें, आणि असें कांहीं आपल्या अंगीं सामर्थ्य येणें हीच आत्मोन्नति, असें त्याच्या मनांत भरावयाला येथें सुरवात होते. आपल्या पुढें गेलेले महात्मे या दृश्याला पूर्ण विरक्त होऊन पुढें गेलेले आहेत, व त्यांनीं चिरसमाधानाचें पद प्राप्त करून घेतलेलें आहे, म्हणून जें त्यांजवर प्रेम बसावयाचें, तें आतां त्यांच्या अंगीं असलेलें सामर्थ्य किंवा वैभव आणि अद्भुत कृत्यें करून दाखविण्याची त्यांची कला पाहून त्यामुळें त्यांजवर प्रेम जडूं लागतें. खरोखर, परमार्थमार्गांत ही

मोठी धोक्याची जागा

आहे. या बाह्य वैभवावर, सामर्थ्यावर एकदां डोळे

ओढ घेऊं लागले, म्हणजे तो परमेश्वराच्या प्रेमभक्तीला व उपासनेला अंतरून या सामर्थ्याचीच उपासना करूं लागतो. मग त्यानें प्रथमतः स्वीकारलेलीं जीं शमदमादि किंवा जपध्यानादि साधनें तीं सर्व तो त्या सामर्थ्यप्राप्तीच्या हेतूनेंच आचरूं लागतो. म्हणजे प्रथमतःपूर्ण विरक्त व केवल मोक्षेच्छु असलेला तो पुरुष आतां मोक्षाची इच्छा कमी करून पुनः या बाह्य भ्रमामध्यें गुंतून पडूं लागतो. या जगद्विषयक बाह्य पदार्थांच्या योगें आपणास पूर्ण समाधान प्राप्त होणें अशक्य आहे, हा जो त्याचा निश्चय झालेला असतो तो ढासळून, तो त्याच जातीच्या या सामर्थ्याचा लोभी होऊं लागतो. आत्मस्वरूपाचें ज्ञान व्हावें व त्यायोगें आपण या सर्व सुखदुःखांच्या पार जावें ही पहिली भावना आतां क्रमाक्रमानें ऱ्हास पावून तो ज्यायोगें आपण कांहीं तरी समर्थ होऊं असें साधन शोधण्याच्या उद्योगास लागतो. 'ईश्वराच्या कृपेनें सर्व कांहीं प्राप्त होतें' किंवा 'ईश्वरपदाला जाऊन पोंचतांच सर्व सिद्धि वश होतात' इत्यादि जीं विधानें परमार्थग्रंथांतून

दिलेलीं आढळतात, आणि संतजनहि आपला तसाच अनुभव सांगत असतात* त्याचा अर्थ 'तेथें खरें व पूर्ण समाधान प्राप्त होतें' असा असतांहि त्याची मातब्बरी न ओळखून, तो दुसऱ्याच वाटेकडे वळतो. त्याला वाटूं लागतें कीं, मी जो उन्नत होणार तो आतां असा उन्नत होणार कीं, त्यायोगें मी बोलेन तें घडेल; जें इच्छीन तें मिळेल; व म्हणेन तें करीन. सारांश मी कांहीं तरी

अलौकिक सामर्थ्यवान्

होईन. अशा प्रकारें त्यानें आपलें आत्मोन्नतीचें स्वरूप एकदां बदललें, म्हणजे तो घसरला व पुनः दृश्याच्या जाळ्यांत गुरफटला म्हणून समजावें. 'खरा आत्मज्ञानी कसा असतो?' यासंबंधांत पुष्कळ वेळां मुमुक्षु पुरुषांमध्यें चर्चा चालतांना आढळतात, त्या वेळीं ज्ञानी पुरुषांच्या अंतरंगींचें जें समाधान तें अत्यंत सूक्ष्म किंबहुना स्वसंवेद्य ( ज्याचें त्यासच कळण्याजोगें ) असल्यामुळें यांना तें ओळखतां न येऊन, ते खऱ्या

---

* तुका म्हणे कांहीं, न मागे आणिक।
तुझे पायीं सुख, सर्व आहे ॥

ता.......

आत्मवेत्त्यांना सोडून देतात, व दुसऱ्या, वैभवास भुललेल्या, सामर्थ्यवान् पण आत्मज्ञानरहित अतएव समाधानशून्य पुरुषांच्याचमागें लागतात. मग जे कोणी हातांतून पाणी काढून दाखवितात, तेच पूर्ण होत, असा त्याला बुद्धिभ्रम होऊं लागतो. दुसऱ्या एकाद्याच्या मनांत काय आहे हें ज्यांना कळतें, तेच खरे ज्ञानी होत; आणि आत्मस्वरूपाचा अनुभव म्हणून म्हणतात तो यांच्याच ठिकाणीं असला पाहिजे, अशा त्यांच्या व्याख्या होऊं लागतात. परमार्थमार्गांतील धोक्याच्या सर्व ठिकाणांमध्यें हेंच ठिकाण फार धोक्याचें आहे ! कारण हेच विचार त्यानें एकदां आपल्या मनाशीं कायम केले, म्हणजे तो जो विरक्तीच्या जोरावर जगद्विषयक सर्व पदार्थजाताचा मोह दूर करून परमार्थमार्गांत प्रविष्ट झालेला असतो, तो पुनः त्याच मोहांत सांपडून, सर्व महासुखाच्या स्वरूपानंदपदावर आरूढ व्हावयाच्या थोर भाग्यास अंतरून, लोकांस असें नाहीं तर तसें, असें कांहीं तरी करून दाखविण्याच्या खुळांत शिरून दुर्दैवाचें आश्रयस्थान होऊन राहतो. आपण जर

परमार्थी आहों, तर आपल्या शब्दानें कोणा एकाद्याचा आजार बरा झाल्याचें कां दिसून येत नाहीं? आपण परमेश्वराचें भजनपूजन जर मनापासून करीत आहों, तर अमुक एक गोष्ट आपल्या मनाप्रमाणें कां घडून आली नाहीं? आपण जर खऱ्या सत्त्वस्थ वृत्तिनें वागत आहों, तर सर्व लोकांचें जें प्रेम बसावयास पाहिजे तें कां बसत नाहीं? असले कांहीं चमत्कारिक संशय त्याच्या मनांत उद्भवूं लागतात व त्यामुळें शुद्ध व प्रेमळ उपासनेचा त्याचा अभ्यास ढिला पडूं लागतो. आणि या वरच्या प्रकारांत जे कोणी निपुण झाले असतील तेच खरे आत्मज्ञानी, असा भ्रम तो आपल्या चित्तांत दृढ करूं लागतो. खरोखर ही मोठी हानि आहे. सर्व सुखदुःखांच्या पार होऊन चिरसमाधानाचें पद ज्याला गांठावयाचें आहे, त्याला या वरील क्षणिक व भ्रामक प्रकारांची काय जरूरी आहे? आपल्याला आत्मस्वरूपाची ओळख पटवून घ्यावयाची आहे, त्या अर्थी अगदीं तदेकनिष्ठ व्हावयाचें तें सोडून, हीं असलीं भलतीं खुळें त्यानें

आपले हृदयांत कां शिरूं द्यावींत? परंतु काय असेल तें असो; असे लोक फार वेळां आढळतात, हें मात्र खरें. कीं. चिरकालिक समाधान प्राप्त करून घ्यावयाच्या मार्गाचें आक्रमण करितां करितां बुद्धि चळून, असें कांहीं बाह्य सामर्थ्य अांगीं आल्याशिवाय त्यांना चैनच पडेनासें होतें. पूर्वकाळीं होऊन गेलेले ब्रह्मज्ञानी कसे समर्थ होते? एकाद्याला शाप देत तर जाळून टाकीत! असें कांहीं सामर्थ्य आपणांत न येईल, तर आपण परमार्थ करून काय मिळविलें! तर आतां निदान आपल्याला जें आत्मज्ञान संपादन करावयाचें तें तरी असें असावें कीं, तें प्राप्त झाल्यावर तरी असें कांहीं अद्भुत सामर्थ्य आपणांत यावें असें त्याच्या मनांत एक वेड घुसून बसतें. हा सामर्थ्याचा मोह सिद्ध पुरुषांवर सुद्धां एखादे वेळीं

---

पूर्वीं ज्ञाते विरक्त भक्त, तयांस साहश्य भगवंत;
आणि सामर्थ्यहि अद्भुत, सिद्धीचेनि योगें ॥३४
ऐसें तयांचें सामर्थ्य, अमुचें ज्ञानचि नुसतें वेर्थ;
ऐसा सामर्थ्याचा स्वार्थ। अंतरीं वसे ॥ ३५॥

—दासबोध, द. ५ स. २

आपला ताबा चालवितो, मग त्यामुळें साधकांची दिशाभूल व्हावी यांत काय नवल आहे? परंतु शुद्ध बुद्धीच्या साधकांनीं वेळींच या मोहापासून परावृत्त होण्याचा प्रयत्न करावा. आपल्या स्वरूपानंदाच्या उच्च ध्येयाला अंतरून असल्या गारुडानें आपली फसगत होऊं देऊं नये! जे पुरुष असल्या गोष्टी स्वतः करून दाखवितात, त्यांच्यासंबंधानें आपल्या मनांत जी पूज्यता वाटूं लागते, तोच या

### मोहाचा जन्मकाळ

होय. म्हणून येथेंच सावधगिरी ठेवावयास पाहिजे. कोणी पुरुष असें कांहीं सामर्थ्य दाखवीत असला तरी त्यायोगें त्याला कांहींच किंमत न देतां, तो जर आत्मानुभवी असेल तरच त्याला मान द्यावयाचा, अशा प्रकारचें आतांपासूनच मनाला वळण लावावें. हातांतून पाणी काढणें, अथवा कोणाचा आजार बरा करणें, असल्या चिन्हांनीं आत्मज्ञानी ओळखावयाचा, अशीच कित्येकांची भावना झालेली असते. दुसऱ्या कोणाची समजूत अशी असते कीं, दुसऱ्याच्या मनांत काय आहे,

किंवा अमुक प्रकरणीं उद्यां काय घडणार आहे हें त्याला कळत असलें पाहिजे. तिसरे याहून पुढें जातात; त्यांच्या मतें तो पूर्णतेला पावलेला पुरुष बुद्धि, मन इत्यादिकांनीं अगदीं सीमेस पोंचला असतो, व त्यामुळें मोठमोठीं असामान्य कार्यें त्याला करितां येतात. म्हणजे तो भिंत चालवील; प्रेतें उठवील; व सर्व प्रसंगांत अपयश असा कधींच घ्यावयाचा नाहीं! सारांश, आम्हां सामान्य जनांपेक्षां त्या अनुभवी पुरुषाला कांहीं तरी विशेष पराक्रम करितां आला पाहिजे व तरच तो अनुभवी होय, ही वेडी समजूत पुष्कळ साधकांच्या मनांवर आपला अंमल गाजविल्याशिवाय राहत नाहीं. आत्मानुभवी पुरुषांची खरी परीक्षा त्यानें ज्या तत्त्वांचें प्रत्यक्ष ज्ञान मिळविलेलें असतें-कीं जें ज्ञान होतांच सर्व मनुष्यमात्रांना या दृश्यासंबंधानें सदैव अलग राहतां येतें—केवळ साक्षी म्हणून राहतां येतें—अतएव सर्व

---

जाणावें दुसऱ्याचे जीवींचें। हें ज्ञान वाटे साचें।
परंतु हें आत्मज्ञानाचें। लक्षण नव्हे॥ ३६॥

—दासबोध, द. ५ स. ५

सुखदुःखांच्या व कर्मांच्या अतीत राहतां येतें— त्यावर, त्या तत्त्वज्ञानावर, अवलंबून असतें; पण ही गोष्ट अत्यंत सूक्ष्म असल्यामुळें पुष्कळ लोक त्याजसंबंधीं अशीं कांहीं तरी सामर्थ्यदर्शक स्थूल लक्षणें निश्चित करितात; व तीं ज्यांच्यांत आढळून येत असतील, त्यांना गुरुस्थानीं ठेवून, केवळ भ्रमानेंच या ज्ञानजन्य स्वरूपानंदाला अंतरतात! आत्मानुभवी पुरुषाच्या ठिकाणीं असें कांहीं तरी अलौकिक सामर्थ्य दिसून आलेंच पाहिजे अशी समजूत धरणें हें किती चुकीचें आहे? आत्मानुभवी पुरुषाला सर्व कामांत यश यावें, ही कल्पना सुद्धां किती भोळी आहे? प्रथमतः या जगांत जो विविध मतवाद दिसून येतो, त्यावरून तर यश व अपयश असें निश्चित विधान करणेंच शक्य होणार नाहीं अशी स्थिति आहे. परंतु दुसऱ्याहि दृष्टीनें ही गोष्ट सिद्ध होते. प्रथमतः ज्या पूर्णतेच्या योगें त्याजवर असे आरोप केले जातात, ती

पूर्णता म्हणजे काय?

हेंच पाहिलें पाहिजे! पण शरीर, मन किंवा बुद्धि

हीं सर्व साकार व गुणधर्मयुक्त असल्यामुळें हीं कोणाचींहि व कोणत्याहि ज्ञानामुळें किंवा प्रयत्नामुळें पूर्णतेला पोंचण्याचा संभवच नाहीं, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. आणि या जगांत कोणतेंहि लहानमोठें कार्य करावयाचें म्हटलें तर त्याला हींच साधनें असणार हें उघड आहे. मग हीं सर्वच ज्या अर्थी मर्यादित आहेत, त्या अर्थी वाटेल तें कार्य यांच्यानें कसें सिद्धीस पावणार? कोणी केवढाहि महापुरुष झाला तरी त्याचें शरीर व मन हीं, माझ्या, तुमच्या अथवा आणखी कोणाच्यापेक्षां कदाचित् अधिक बळवान् व उन्नत झालेलीं असतील; परंतु त्याच्यापेक्षांहि बळवान् असा कोणी पुरुष या सर्व विश्वांत केव्हां तरी आढळलाच पाहिजे हें खचित आहे. 'एकाहुनि एक चढी जगामधिं' हें बंधन या समर्याद पदार्थांना केव्हांहि टाळतां यावयाचें नाहीं. मग ज्याच्यावर अन्य कोणी बलिष्ठ आहे, त्याची

---

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥
शरीरवाङ्मनोभिर्यत्... ।—भगवद्गीता, अ. १८

कर्तबगारी व यश हीं निश्चित व पूर्ण कशीं असतील? प्रत्येक पदार्थ असा आहे कीं, तो खालून पाहिल्यास उंच व वरून पाहिल्यास नीच दिसतो. अशा प्रकारें सापेक्षता ही जर

सर्व पदार्थास कलंक

लावल्यावांचून रहात नाहीं, तर यांत सर्वथा पूर्ण असा एखादा पदार्थ असूं शकेल, हें शक्य तरी कसें आहे? म्हणून सर्वथा यशस्वी होणारा पुरुष वंध्यापुत्राप्रमाणें सर्वथा अशक्य आहे! तेव्हां कोणी कांहीं विशिष्ट सामर्थ्यानें युक्त दिसत असला मग तें सामर्थ्य केवढेंहि प्रचंड असेना—त्यावरून त्याला पूर्ण किंवा अनुभवी मानणें हें निखालस चुकीचें आहे! तुम्ही आपल्या बुद्धीचा, मनाचा, अथवा अन्य कोणत्याहि अंगांचा विकास करा, तुमच्यावर तुमच्यापेक्षां श्रेष्ठ असा कोणी तरी आहे हें तुम्हांला प्रतीत होण्याला कालत्रयीं अडथळा येणार नाहीं! म्हणून या अंगांनीं आपण पूर्ण होऊं असें मानणें ही केवळ भूल आहे. आत्मोन्नति याहून अत्यंत भिन्न आहे. पूर्ण उन्नतावस्थेचें पद आत्म्यालाच राखून ठेवलेलें आहे.

तें कोणत्याही प्रकारें या मनाला व बुद्धीला केव्हांहि मिळण्याचा संभव नाहीं. व म्हणूनच जे जगद्व्यवहार या देहाहि आत्मभिन्न पदार्थांकडून घडावयाचे असतात, त्यांवरून—मग ते व्यवहार केवढाले प्रचंड व लोकोत्तर असेनात, त्यांवरून—एकाद्याला पूर्ण अनुभवी समजणें हें सर्वथा चुकीचें आहे. येथेंच अत्यंत सूक्ष्मपणें विचार करणें अगत्याचें आहे. आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर दुसऱ्याच्या मनांतील अथवा आणखी सर्व कांहीं त्याला कळलें पाहिजे हाहि एक भ्रम आहे. कळणें आणि न कळणें या गोष्टी जेथें चालतात तें सूक्ष्मदेहाचें ठिकाण आहे. आत्मा सूक्ष्मदेहाहून वेगळा आहे. व हा सूक्ष्मदेह आत्म्याच्या पूर्णतेच्या स्थानीं केव्हांहि पावणें नाहीं, हें आतां वर सांगितलेंच आहे. आत्मस्वरूपाचें ज्ञान व्हावयाचें म्हणजे स्थूलदेह किंवा सूक्ष्मदेह यांची कांहीं विशिष्ट वाढ करावयाची असें नसून, त्यांहून मी, आत्मा, अत्यंत वेगळा, सदैव, आहें हें प्रत्यक्ष प्रत्ययास यावयाचें. मी देहहि नव्हें; व मनहि नव्हें, अर्थात् देहांत व मनांत जे व्यवहार

चालावयाचे त्यांहून मी अतीत आहें! हा आत्मवेत्याचा भाव. व साधकालाहि याच प्रत्ययाची आवश्यकता असते. मग शरीरानें किंवा मनानें एकाद्यानें कांहीं लोकोत्तर कृति केल्या तर तेवढ्यानें खऱ्या साधकाला चपापून जाण्याचें कांहींच प्रयोजन उरत नाहीं. कोणीहि पुरुष या अशा आत्मबाह्य उपकरणांनीं करावयाचें तें कृत्य असें करो वा तसें करो; यशस्वी होवो, किंवा अपयशी होवो, हे सर्व व्यवहार आत्मस्वरूपावर-आत्म्याच्या ज्ञानानंदस्वरूपावर-अपूर्णतेनें उदित झालेल्या अहंकारादिकांचे अर्थात् सूक्ष्मादि देहांच असणार हें खास. अर्थात् यांयोगें एकाद्याची पूर्णता झाली आहे किंवा नाहीं हें ठरविणें कसें योग्य होईल? ज्ञानी ओळखण्याचें फक्त

एकच साधन,

शुद्ध बुद्धीच्या योगें त्यानें संपादन केलेलें व अनुभविलेलें तत्त्वज्ञान. व तें त्यास प्राप्त झाल्याची खूण मुख्यतः सांगावयाची तर ीं त्याजकडून साधकाला मिळत आहे कीं नाहीं ही होय. स्वतः ज्याला तत्त्वाचा अनुभव आला आहे, तो

ता.

पुरुष प्रयत्नशील साधकाला त्याचा अनुभव आणून देऊं शकेल. व साधकानें हेंच काय तें पाहून त्याला गुरुत्व द्यावयाचें आहे. परंतु असा ज्ञानविचाराचा शोध न करतां, कोणी कांहीं अद्भुत कार्य करूं शकतो म्हणून त्यास गुरुत्व देणें निखालस चुकीचें आहे! मला प्रेत उठवितां येत नाहीं, व तें तुम्ही उठवितां, एवढ्यावरून तुम्ही आत्मज्ञान व तज्जन्य आनंद हीं संपादन केलीं आहेत असें समजण्याचें मला काय प्रयोजन आहे? देहादिकांवर सत्ता चालविणें हें कांहीं आत्मज्ञान नव्हे. देह, मन, इत्यादिकांवर सत्ता चालविण्याचें काम एकादा दांड माणूसहि करील, एकादा पोलिस शिपाई करील! एकाद्या पर्वताचा कडा किंवा नदीचा प्रवाहहि माझ्या देहावर सत्ता चालवितो. वायुरूपानें राहणारें एखादें पिशाच्चसुद्धां एकाद्या माणसाच्या देहांत रोग आणून ठेवूं शकतें. मग अशा सामर्थ्यवान पुरुषांचीहि योग्यता यांहून जास्त मानण्याचें कारण काय? पाण्यावरून चालण्याची कला एकानें महाप्रयासानें संपादन केली. भिंतीवर उगीच डोकें

घासलें. त्याला पाहून स्वामी रामकृष्ण परमहंस म्हणाले " अरेरे, तुझे फार हाल झाले! मी तर २ पैसे देऊन या नदीच्या पार जातों!" सारांश, साधारण जनांना एखादी करतां न येणारी गोष्ट करून दाखवितां येत असली तरी त्यावरून तो पुरुष पूर्णपदाला पोंचला आहे असें अनुमान करणें कसें योग्य होईल? म्हणून खऱ्या साधकानें अशा लोकांना आपलें गुरुत्व देणें हें अत्यंत हानिकर आहे. जे हातांतून पाणी काढतील, जे कोणाचा आजार दूर करितील, कोणाच्या मनांतलें सांगतील, कोणाचें आयुष्य सांगतील, किंवा मनांत आणतील तें सिद्धीस नेतील, ते ते मात्र आत्मज्ञानी, ही

साफ खोटी गोष्ट

आहे! हा एक भ्रम आहे! दृश्य पदार्थांचा लोभ पूर्ण निवृत्त झालेला नसल्यामुळें साधकाच्या चित्तांत घुसून बसणारा हा एक मल आहे. विवेकशील साधकानें अशा मोहापासून फार दूर राहावें. त्यानें असें स्पष्ट म्हटलें पाहिजे कीं, ज्या अर्थीं मी चिरंतन समाधानाची अपेक्षा करीत

९५२२



आहें व हें चिरंतन समाधान ज्या अर्थी कोणत्याहि दृश्य पदार्थानें मिळण्याचा संभव नाहीं हें उघड आहे, त्या अर्थीं कोणी प्रेतें उठवोत किंवा आयुष्य सांगोत–मला या कलांची व त्या कला जाणणाऱ्याची कांहीं किंमत नाहीं! कारण प्रेतें उठवा, कीं आणखी कांहीं करा, एका आत्मज्ञाना वांचून अन्य सार या जगांत कांहीं नाहीं! कारण एकाद्याची पोटदुखी नाहींशी करून काय लाभ आहे? सर्व पोटदुखींची पोटदुखी अशी जी संसाररोग उत्पन्न करणारी अज्ञानकणिका ती जर नष्ट केली नाहीं तर कोणीहि मनुष्य खरा निरोगी असा होऊंच शकत नाहीं! म्हणून कोणाच्या मनांतलें ओळखणें व आणखी कांहीं करून दाखविणें हे सर्व जगन्मोहाचेच परिणाम होत. शुद्ध आत्मज्ञानाच्या दृष्टीनें हे सर्व पोरखेळ होत. मला जन्म नाहीं, मृत्यु नाहीं, वृद्धि नाहीं, क्षय नाहीं; मला सुखदु:खांचा संबंध नाहीं; मला कर्में स्पर्श करूं शकत नाहींत; असा मी सर्वांच्या अंतर्यामीं असून सर्वानंदरूप आहें, हें निःसंशयपणें प्रत्ययास येणें हेंच खरें आत्मज्ञान; व हें

जगन्मोहांत गुंतण्याची वेळ असल्यानें, ज्या महत्म्यांच्या देहांत असली सिद्धि फारशी चकाकत नसेल असेच अनुभवी पुरुष साधकाच्या उपयोगाचे असतात. तसेंच जे असें सामर्थ्य दाखवीत असतील ते अनुभवीच असतील असेंहि निश्चयात्मक मानतां येत नसल्यामुळें अशांच्या संगतींत राहिल्यानें ते याला त्याच खुळाचें महत्त्व सांगत बसतील, असेंहि होण्याचा संभव आहे! म्हणून साधकानें त्यांचे असले प्रकार पाहून भिऊंहि नये व लोभीहि होऊं नये. लोकांच्या मनांतलें सांगतां येणें, अथवा अन्य कांहीं करणें हें मेस्मेरिझमप्रमाणें एक प्रकारचा योगाभ्यास करणारांना साध्य होणें शक्य आहे. परंतु तेवढ्यानें चिरसमाधानाची अपेक्षा करणाऱ्या मोक्षमार्गी पुरुषाच्या गुरुस्थानीं राहण्यास ते पात्र आहेत असें होत नाहीं. हे एक प्रकारचे नजरबंदीचे खेळच होत. सधारण गारुडी लोक

---

तैसा गुरु नसावा। जेणें अंतर पडे देवा।
भीड करूनिया गोवा। घाली बंधनाचा ॥२७॥
—दासबोध द. ५ स. २

अशिक्षित माणसांचें मन मोहित करतात, हे सुशिक्षित लोकांना मोह घालतात. व मग हे लोक त्या गुरुशक्तीच्या लोभानें त्यांचा आश्रय करतात. परंतु खरा परमार्थ याहून वेगळा आहे. असे पुरुष दुसऱ्यांना आत्मज्ञान करून देण्याच्या विशेषसे उपयोगास येऊं शकत नाहींत. म्हणून अशांच्यासंबंधीं मनांत प्रेम वाटूं लागतांच सर्व साधकांनीं सावध व्हावें, व तेथून परतून शुद्ध आत्मज्ञानाकडे वळावें. पुष्कळ लोक एकाद्याच्या आश्रयास राहिले आहेत, एवढ्यावरून ती आत्मज्ञानाची शाळा आहे असें मानूं नये. आत्मज्ञान हें केवळ विचारगम्य आहे. म्हणून जे विवेकाची दिशा दाखवूं शकत नाहींत, ते मोठे असोत किंवा लहान असोत, अशा साधकाला ते निरुपयोगी होत. आपल्या नेत्रांना व इतर इंद्रियांना, तीं या मायेच्या बाजारांतीलच असल्यामुळें अशा या लोकांच्या बाह्य वैभवाचें प्रेम सहज उत्पन्न होतें. परंतु खऱ्या साधकाला या स्थूल व सूक्ष्म दोन्ही सामर्थ्यांच्या पलीकडे असलेल्या आत्मस्वरूपास जाऊन पोंचावयाचें असल्यामुळें हे

ज्यापाशीं असेल तोच या साधकाचा खरा गुरु! साधकाला जेथें जावयाचें आहे तें

हेंच परमपद होय.

त्यामुळें हें सोडून अन्य कोणत्याहि गोष्टीची त्याला प्रतिष्ठा वाटतां कामा नये! ज्याला आत्मज्ञान व चिरसमाधान हीं अपेक्षित नसतील, त्याला त्याच्या वासनेप्रमाणें यांतील एकाद्या खुळाच्या व तशा आपल्या गुरूच्या मागें लागण्याला रस्ता खुलाच आहे. परंतु खऱ्या तत्त्वैकनिष्ठ साधकानें अशा खुळांत गुंतलेल्या सर्व सिद्धसाधकांना दुरूनच नमस्कार करावा. 'तुम्ही किती सामर्थ्यवान् आहांत याची मला जरूरी नाहीं. सर्व सुखाचें आगर असा जो आत्मा म्हणतात, तो माझ्या प्रत्ययास आणून देण्याला तुम्ही तयार आहांत काय? नसाल, तर ते तुमचे खेळ पाह-

---

देखणें दाखविती आदरें, मंत्र फुंकिती कर्णद्वारें; इतुकेंच ज्ञान, ते पामरें। अंतरलीं भगवंता ॥२९
शिष्यास न लाविती साधन, न करविती इंद्रियदमन; ऐसे गुरु अडक्याचे तीन, मिळाले तरी त्यजावे ॥ ३१ ॥ — दासबोध द. ५ स. २

ण्याची माझी इच्छा नाहीं.' असा रोकडा जबाब त्यानें या सर्व महात्म्यांना दिला पाहिजे. आपल्या ध्येयापासून चळतां कामा नये. आत्मज्ञान किंवा खरें समाधान आणि लोकोत्तर कार्यें किंवा सिद्धि प्राप्त करून घेण्याचे मार्ग हीं परस्पर अत्यंत भिन्न आहेत. मला इच्छाच असल्यास प्रेतें उठविण्याची कला प्रयत्नानें प्राप्त करून घेतां येईल, परंतु जगांतील राज्यादि अधिकार जसे चिरसुखास पोंचवूं शकत नाहींत, त्याप्रमाणेंच प्रेतें उठावण्याच्या कलेनें मी कित्येक शिष्य संपादन केले तरी माझ्या मनाचें दैन्य संपणार नाहीं. परमार्थमार्गदर्शक अशा सर्व शास्त्रांतूनहि सांगून ठेविलें आहे कीं, बाबांनो, सिद्धींला जपा; त्या तुमचा घात करितील! पण हा इषारा सिद्धांबरोबर साधकांनाही आवश्यक आहे! कारण प्राप्त झालेल्या सिद्धीच्या मोहांत गुंतणें हें जसें घातक आहे, तसेंच तत्पूर्वींहि आपल्या गुरुस्थानीं म्हणून जे आचार्य, महात्मे किंवा ऋषि ठेवावयाचे तेहि त्यांजपाशीं असलेल्या सामर्थ्याला भूलून ठेवतां कामा नये. किंबहुना ही पुनः

जगन्मोहांत गुंतण्याची वेळ असल्यानें, ज्या महत्म्यांच्या देहांत असली सिद्धि फारशी चकाकत नसेल असेच अनुभवी पुरुष साधकाच्या उपयोगाचे असतात. तसेंच जे असें सामर्थ्य दाखवीत असतील ते अनुभवीच असतील असें- हि निश्चयात्मक मानतां येत नसल्यामुळें अशां- च्या संगतींत राहिल्यानें ते याला त्याच खुळाचें महत्त्व सांगत बसतील, असेंहि होण्याचा संभव आहे! म्हणून साधकानें त्यांचे असले प्रकार पाहून भिऊंहि नये व लोभीहि होऊं नये. लोकांच्या मनांतलें सांगतां येणें, अथवा अन्य कांहीं करणें हें मेस्मेरिझमप्रमाणें एक प्रकारचा योगाभ्यास करणारांना साध्य होणें शक्य आहे. परंतु तेवढ्यानें चिरसमाधानाची अपेक्षा करणाऱ्या मोक्षमार्गी पुरुषाच्या गुरुस्थानीं राहण्यास ते पात्र आहेत असें होत नाहीं. हे एक प्रकारचे नजरबंदीचे खेळच होत. सधारण गारुडी लोक

---

तैसा गुरु नसावा । जेणें अंतर पडे देवा ।
भीड करूनिया गोवा । घाली बंधनाचा ॥२७॥
—दासबोध द. ५ स. २

अशिक्षित माणसांचें मन मोहित करतात, हे सुशिक्षित लोकांना मोह घालतात. व मग हे लोक त्या गुरुशक्तीच्या लोभानें त्यांचा आश्रय करतात. परंतु खरा परमार्थ याहून वेगळा आहे. असे पुरुष दुसऱ्यांना आत्मज्ञान करून देण्याच्या विशेषसे उपयोगास येऊं शकत नाहींत. म्हणून अशांच्यासंबंधीं मनांत प्रेम वाटूं लागतांच सर्व साधकांनीं सावध व्हावें, व तेथून परतून शुद्ध आत्मज्ञानाकडे वळावें. पुष्कळ लोक एकाद्याच्या आश्रयास राहिले आहेत, एवढ्यावरून ती आत्मज्ञानाची शाळा आहे असें मानूं नये. आत्मज्ञान हें केवळ विचारगम्य आहे. म्हणून जे विवेकाची दिशा दाखवूं शकत नाहींत, ते मोठे असोत किंवा लहान असोत, अशा साधकाला ते निरुपयोगी होत. आपल्या नेत्रांना व इतर इंद्रियांना, तीं या मायेच्या बाजारांतीलच असल्यामुळें अशा या लोकांच्या बाह्य वैभवाचें प्रेम सहज उत्पन्न होतें. परंतु खऱ्या साधकाला या स्थूल व सूक्ष्म दोन्ही सामर्थ्यांच्या पलीकडे असलेल्या आत्मस्वरूपास जाऊन पोंचावयाचें असल्यामुळें हे

दोन्ही गारुडी-ते सूक्ष्म सामर्थ्यांनीं युक्त असले तरी-त्यांचा त्यागच केला पाहिजे. व त्यांचा त्याग करिते वेळींच, आपल्याहि देहाच्या व मनाच्या सामर्थ्यांची वाढ करण्याचा नाद सोडून दिला पाहिजे. तुम्हीं हें निश्चयानें ध्यानांत ठेवा कीं, जसें शरीर, तसेंच मनहि, पूर्णावस्थेला केव्हांहि पोंचणारें नव्हे! यासाठीं

खरें आत्मनिवेदन

म्हणजे हेंच कीं, आपलें म्हणून मानलेलें हें शरीर व तदंतर्गत मन हीं दोन्ही यदृच्छया जेथें व जशीं राहतील तशीं राहोत, त्यांशीं मज केवल ज्ञानस्वरूप आत्म्याचा कांहीं एक संबंध नाहीं. मी असंग व त्याबरोबरच अखंड आनंदरूप आहें. अथवा आतां मी म्हणून कोणी नाहींच. अहंकाररहित एक चिदानंदस्वरूपच सर्व आहे. अशा तऱ्हेचा प्रत्यय येणें हाच खरा परमार्थ. याव्यतिरिक्त सर्व गारुड आहे म्हणून समजावें. आणि साधकाला ज्याप्रमाणें अशा गोष्टींची प्रतिष्ठा वाटतां कामा नये, त्याप्रमाणें पूर्ण आत्मानुभवी पुरुषांनाहि या गोष्टींचा कांहीं प्रतिष्ठा वाटत नसते

हेंहि उघड आहे. म्हणून जे आपणांजवळ अमुक सामर्थ्य आहे म्हणून आपण श्रेष्ठ आहों असें समजतात, ते मायामोहाच्या प्रवाहांत सांपडलेले, अतएव क्षुद्र आहेत म्हणून समजावें.

परमार्थमार्गांतील वाटसरूंना ही एक धोक्याची जागा आहे, एवढेंच येथें सांगावयाचें आहे. सर्व आनंदाचें स्थान हें या अशा किंवा तशा कृति करण्यांत नाहीं किंवा एकाद्या उद्योगांत यशस्वी होण्यांतहि नाहीं. आत्मज्ञानी पुरुष आपण सर्वबंधनरहित, सुखदुःखरहित, जन्ममृत्युरहित, सदानंदरूप आहों असें दृढपणें जाणत असतो. त्याजकडून अशीं कांहीं कृत्यें कधीं कधीं घडतात हें खरें, परंतु यामुळें तर लोकांची दिशाभूल होते. व 'कांहीं सामर्थ्य असेल तर आत्मज्ञान, नाहींतर आत्मज्ञानच नव्हे,' असा लोकांचा बुद्धिभेद झालेला आढळून येतो. परंतु खऱ्या परमार्थसाधकानें हें चांगलें ध्यानांत ठेवावें कीं, सामर्थ्य असणाराहि पुरुष आत्मज्ञानशून्य असूं शकतो आणि आत्मवेत्ताहि कधीं कधीं अशा सामर्थ्यानें रहित असू शकतो. नियतीच्या ओघांत टाकून दिलेल्या त्या-

च्याहि शरीरावर व मनावर कधीं कधीं अपयश घेण्याच्या वेळा येतात. व कधीं कधीं अद्भुत प्रकार करण्याचे कामीं तो मागें पडूं शकतो. म्हणून

'सामर्थ्य असेल तरच आत्मज्ञान'

हा विचारच खोटा आहे. जसा कोणी विद्वान् आहे, तर तो श्रीमान् असेल काय? तर असेलहि आणि नसेलहि. आणि कोणी श्रीमान् आहे तर तो विद्वान् असेल काय? तर असेलहि आणि नसेलहि. तसाच आत्मज्ञान आणि सामर्थ्य यांचा संबंध आहे. परंतु हें न ओळखून, पुष्कळ साधक शुद्ध भावानें प्रथम या मार्गांत प्रविष्ट झालेले असूनही या चकाकीच्या मोहानें आपली वाट सोडून, आत्मज्ञानासंबंधीं जी तीव्रता ठेवावयाची तींत ढिले पडतात, आणि प्रत्यक्ष व्यवहारांत कांहीं सामर्थ्य दाखविण्याचा व यश संपादण्याचा मार्ग जो कोणी दाखवील त्याच्याच मागें लागतात. सारांश, परमार्थाचा पुनः संसार बनवितात. गायत्रीपुरश्चरण करावें, कां? तर भूतपिशाच्चादिकांवर आपला अंमल चालेल म्हणून. ध्यान-अभ्यास करावा, कां? तर दुसऱ्यांच्या

मनांतील गोष्टी जाणतां येतील, म्हणून. सारांश अशा बुद्धीनें तुम्ही जीं जीं साधनें कराल तीं तीं वरून परमार्थासारखीं दिसणारीं असलीं तरी, तीं या देहाची प्रतिष्ठा वाढविण्याकरितांच योजिलीं असल्यामुळें तो सर्व अविद्येचाच पसारा होय. म्हणून अशा प्रकारांना इतर आचरणापेक्षां थोरवी देतां येईल; परंतु "मला कांहींएक नको; केवळ आत्मज्ञान पाहिजे" ही जी खऱ्या मुमुक्षूच्या अंतःकरणांतील शुद्ध भावना तिच्या मानानें हें सर्व अगदीं फिकें आहे !

जगद्विषयक सर्व मोहांस दूर लोटून परमार्थ-मार्गांत प्रविष्ट झालेल्या खऱ्या मोक्षसाधका! हें विवेचन तुझ्या ध्यानांत उतरेल काय? सर्व सामर्थ्याचा मोह गुंडाळून ठेवून तूं त्या परमात्मस्वरूप शुद्ध आनंदसागराच्या ठिकाणीं अगदीं तदेकनिष्ठ राहावयाचा निश्चय करशील काय?

---

सिद्धि आणि सामर्थ्य जालें, सामर्थ्यें देहास महत्व आलें; तेणें बेचाड बळकाविलें, देहबुद्धीचें.
होतां शरीरासि अंत, सामर्थ्यहि निघोन जात;
सेखीं अंतरला भगवंत, कामनागुणें. ॥ ४३ ॥

--दासबोध, द. ५ स., २

## रघुवीरदासविरचित अध्यात्मरामकथा

### धर्मजागृतिकार म्हणतातः—

हा ग्रंथ सुप्रसिद्ध श्रीमदध्यात्मरामायणाचें ओंवीबद्ध रूपांतर आहे. मूळ ग्रंथ संस्कृत असून तो रामभक्तांचा आवडता व नित्यपाठाचा आहे. सदरहु ग्रंथांत श्रीरामचरित्राचें कथानक क्रमशः त्रोटक वर्णन केलें असून प्रत्येक सर्गांत अध्यात्मविषय कमी अधिक प्रमाणानें प्रतिपादन केलेला आहे. सबंध ग्रंथांत कर्म, ज्ञान, उपासना, बंध, मोक्ष व तदंगभूत वेदान्त विषयाची सांगोपांग चर्चा असून, वाचकांस श्रीरामाच्या तात्त्विक स्वरूपाचें यथार्थ ज्ञान करून देऊन मोक्ष प्राप्त करून देणें हा ग्रंथाचा हेतु आहे. संस्कृत भाषा येत नसलेल्या हजारों वाचकांस त्या मौल्यवान् पारमार्थिक ग्रंथांतील रहस्य समजणें दुःसाध्य आहे. तेव्हां प्रस्तुत प्राकृत ग्रंथानें ही उणीव चांगल्या रीतीनें भरून काढिली आहे. ग्रंथांतील भाषा सरळ व सुबोध असून प्रासादिक आहे. ग्रंथकार हे रघुवीराचे भक्त व अध्यात्मरामायणाचे उपासक असल्यामुळें आपला आवडता वेदान्त विषय त्यांनीं ठिकठिकाणीं अगदीं सोप्या भाषेंत फार थोडक्यांत पण सामान्य जनांस सहज समजेल अशा रीतीनें पुढें मांडला आहे. मूळ ग्रंथांतील कथानक ओवींमध्यें सविस्तर उतरलें आहे. काव्याचा ओघ

अगदीं अकृत्रिम असा भासतो. **रामहृदय** या नांवानें प्रसिद्ध असलेलें प्रकरण मूळ ग्रंथांत समजण्यास फार दुर्बोध आहे. परंतु या आपल्या काव्यग्रंथांत ( पृष्ठ १४-२२ ) रघुवीरदासांनीं हें प्रकरण अगदीं उघड भाषेंत सुबोध करून टाकून त्यांतील रहस्य जणूं काय वाचकांचे हातांत दिलें आहे! त्या रहस्याशीं मुमुक्षूनें परिचय करावा, व त्याचा भेद करून रामहृदयमंदिरांत अक्षय स्वरूप स्थितींत रहावें. आमच्या मतें पारमार्थिक पुराण ग्रंथांपैकीं महत्त्वाच्या अशा अध्यात्मरामायणग्रंथाचें प्रस्तुतचा ओंवीबद्ध ग्रंथ हें विश्वसनीय व प्रासादिक रूपांतर आहे, व तें मुमुक्षूंच्या आदरास पात्र आहे. काव्य ह्या दृष्टीनेंसुद्धां हें बहुमोल व संग्रहणीय आहे.

'रघुवीरदास' हे या मासिकांतील प्रसिद्ध लेखक, **रा. बाळकृष्ण भाऊ जोशी** हे होत.

'आत्मोद्धार'कर्ते **श्रीयुत पिंपुटकर** म्हणतात—

रघुवीरदास यांचा हा ग्रंथ त्यांच्या इतर सर्व ग्रंथांपेक्षां विशेष महत्त्वाचा असून आपल्या समाजाला फार उपकारक झाला आहे. भाषा अत्यंत साधी, सुंदर व कोणालाहि सहज कळण्यासारखी असून, वाचतां वाचतांच प्रेमळ रामभक्त अगदीं तल्लीन होऊन जावा इतकी आकर्षक आहे! भाषेचा डौल व प्रौढपणा तर पूर्वींच्या साधुसंतांच्या ग्रंथांप्रमाणें वाटतो! त्यावरून कवीची रामकथेशीं तन्मयता झालेली दिसून येते. भा-

विक रामभक्तांनीं व रसिक जनांनीं अशा सुंदर ग्रंथाचा अवश्य संग्रह करावा, अशी आम्ही शिफारस करितों.'

भाग १, कांडें १ ते ४; पृष्ठें २७०; बांधणी कापडी, कागद ग्लेज, किं.रु. १॥; हाफग्लेज कागद, किं. १। रु.

**साकीबद्ध अमृतानुभवः**–या टीकेचा अलीकडील सर्व टकांत बाबा गर्दे यांनीं पहिला नंबर लाविला व हंसराजस्वामींच्या टीकेपेक्षांहि सरस म्हटलें आहे! व मूळापेक्षांहि एक दृष्टीनें हें पद्यरूप हृदयाल्हादक झालें आहे, असें रा. म. ह्. मोडक बी. ए. म्हणतात.

पृ. ९६ किं. ४ आणे.

**नवपुष्पमाला**—यांत श्रीरामचरित्ररहस्य, भिक्षुगीत, त्रिगुणातीत, स्फुट पदें इत्यादि लहान मोठीं १० प्रकरणें असून कविता अगदीं सुबोध आहे. किं. ८२

**अपरोक्षानुभूति**—शंकराचार्यांचे मूळ संस्कृत स्तोत्रावर ह्या साक्या केल्या आहेत. शिवाय सुंदर गोपीगीत व ज्ञानपर एक पद जोडलें आहे. पृ. २०; किं. ८२.

**संमोहनिरास**—देवानें हें जग उत्पन्न कां केलें? व त्यांत दुःख कां असावें? इत्यादि संमोहांवर वेदान्त शास्त्रानें उत्तर ४३ श्लोकांत यांत दिलें आहे. किं.८॥.

मिळण्याचें ठिकाण–**यशवंत छापखाना, पुणें.**

---

मुद्रक–अच्युत चिंतामण भट, यशवंत प्रेस, पुणें शहर.
प्रकाशक–बा. भा. जोशी, १४८३ कसबा, पुणें शहर.

## श्रीदत्तभार्गवसंवाद.

त्रिपुरारहस्यावरून मराठींत आणलेला ग्रंथ. तत्वज्ञानाचा असून कथानकांत गोविल्यामुळें कादंब प्रमाणें चटकदार. **बाबा गर्दे** म्हणतातः–अलीकड सर्व वेदान्तग्रंथांत हा उत्कृष्ट ग्रंथ आहे. **धर्मजागृति** कारांनींहि शिफारस केली आहे. व धुळ्याचे **शंकरराव देव** म्हणतात– 'खरोखर हा ग्रंथ इतका आनंददायक आहे कीं, नाइलाजास्तव, वर्ष सहा महिने आमचें मासिक बंद करून घेऊन वाचला तरी त्यांत आम्हांस आनंद आहे!' पृ. २४४, बांधणी कापडी, किं. १ रु.

**मारुतीचा ओटा**—या पुस्तकांत एका उपासकाचें आत्मवृत्त दिलें असून, निष्काम उपासनेची तीव्रत कशी असते व उपासनेनें ज्ञानभावना कसकशा जागृ होतात हें गोष्टीच्या रूपानें दाखविलें आहे. किं. ८–

**खडीसाखरेचा डबा**–यांत खडीसाखरेचे १३ खं म्हणजे अध्यात्मज्ञानपर सुंदर गोष्टी असून "योगक्षे वहाम्यहम्' ही ध्यानाभ्यासांतील एक अनुभविक गो दिली आहे. अभ्यासी मनुष्याला फार उपयोगी. किं.८

**खरें कर्तव्य**—एक छोटा निबंध. यांत मनुष्य जन्मास येऊन मुख्य काय साधावें तें मार्मिक ऊहा करून सांगितलें आहे. पृ. ३१ किं. १। आणा.

**सामर्थ्याचा मोह**–प्रस्तुत पुस्तक किं. १॥ आ

मिळण्याचें ठिकाण–यशवंत छापखाना, पुणें.

९५२२

REFBK-0001522